'करोना' निष्क्रिय करणारे तंत्रज्ञान शिवाजी विद्यापीठाकडून विकसित

विषाणू ९९% निष्क्रिय करण्याची क्षमता

कोल्हापूर, दि. १८ (प्रतिनिधी) - संपूर्ण जगाला ग्रासलेल्या 'कोविड-१९' अर्थात करोना विषाणूला निष्क्रिय करू शकणारे महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक संशोधन येथील शिवाजी विद्यापीठाच्या नॅनोफॅब्रिक्स सेंटरच्या संशोधकांनी केले आहे. 'व्हायरस कवच' या फॅब्रिक स्प्रे (कपड्यांवर मारावयाचा फवारा) तंत्रज्ञानामुळे करोना व्हायरससह अन्य अनेक घातक विषाणूंना निष्क्रिय करणे शक्य होणार आहे, ही माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

विद्यापीठात आज सकाळी नॅनोसायन्स व तंत्रज्ञान स्कूलचे डॉ. किरणकुमार शर्मा या संशोधकांसह या उत्पादनाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पुणे येथील इकोसायन्स इनोव्हेशन प्रा. लि. या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत म्हेतर, संचालक अजय म्हेतर यांनी या महत्वपूर्ण संशोधनाबद्दल माहिती दिली.

'व्हायरस कवच' तंत्रज्ञानाच्या प्रभावाने कोविड-१९ विषाणू ९९.९९ टक्क्यांपेक्षाही अधिक निष्क्रिय झाल्याचे आंतरराष्ट्रीय चाचण्यांमध्ये दिसून आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ नॅनोफॅब्रिक्सचे प्रा. किरणकुमार शर्मा यांनी प्रा. पी. एस. पाटील आणि डॉ. किरण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या संदर्भातील संशोधन केले आहे.

व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे तंत्रज्ञान हे वापरावयास अत्यंत सुलभ व सोपे आहे. हा स्प्रे फक्त आपल्या कपड्यांवर फवारायचा आहे. वाळल्यानंतर पुढे तो कपडे धुवून टाकेपर्यंत आपल्याभोवती संरक्षक कवचाप्रमाणे ते काम करते. कपडे धुतल्यानंतर पुन्हा त्यावर हे फवारावे. केवळ सेंद्रिय कार्बोक्झिलिक ॲसिडची संयुगे आहेत जी पर्यावरणपूरक आहेत, असा दाखला अमेरिकेतील पर्यावरण सुरक्षा एजन्सीने दिला आहे. त्याला अमेरिकेनेही मान्यताही दिलेली आहे.

'व्हायरस कवच'च्या देशासह जगातील आघाडीच्या प्रयोगशाळांत चाचण्या घेण्यात आल्या आहेत.

(पान २ पहा) ▸▸

पुढारी

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत आज कोल्हापूर दौऱ्यावर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत रविवारी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. शिवाजी विद्यापीठात सकाळी आढावा बैठक, शिक्षक संघाच्या शिष्टमंडळासमवेत चर्चा आदी कार्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत.

शिवाजी विद्यापीठ येथे सकाळी ११ वाजता आगमन होईल. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक उपक्रम राबविण्यासंदर्भात मुख्य इमारतीमध्ये बैठक होणार आहे. याप्रसंगी पालकमंत्री सतेज पाटील, ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ, खा. संजय मंडलिक, चंदगडचे आ. राजेश पाटील, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक यांच्यासह कुलगुरू डॉ. नितीन करमळकर उपस्थित राहतील.

दुपारी १२ ते १.३० या वेळेत विद्यापीठात आढावा बैठक होईल. १.३० वाजता मंत्री सामंत शिवाजी विद्यापीठ, शिक्षक संघ शिष्टमंडळासमवेत चर्चा करणार आहेत. दु. १.४५ ते २ वाजेपर्यंत अभ्यागत व शिष्टमंडळाच्या भेटीसाठी वेळ राखीव असून तीन वाजता पत्रकार परिषदेत माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत. ४.३० वाजता वाशी, ता. करवीर येथे बाबासाहेब पाटील यांची सांत्वनपर भेट घेणार आहेत. त्यानंतर मोटारीने मुंबईकडे ते प्रयाण करतील.

संडे अँकर । शिवाजी विद्यापीठ : शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रतिक्रिया

गडहिंग्लजच्या उपकेंद्रामुळे सीमाभागालाही न्याय

राम मगदूम ।
लोकमत न्यूज नेटवर्क

गडहिंग्लज : सीमाभागासह चंदगड, आजरा, गडहिंग्लज, भुदरगड, गारगोटी व कापशी खोऱ्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र गडहिंग्लजमध्येच व्हावे, असा आग्रह शैक्षणिक जगतासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा आहे. त्यासंदर्भातील काही निवडक प्रतिक्रिया

“ शिवाजी विद्यापीठाची पदवी घेण्यासाठी धडपडणाऱ्या सीमाभागातील बेळगाव-खानापूरसह गोवा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली, सावंतवाडी व दोडामार्ग येथील विद्यार्थ्यांसाठी गडहिंग्लज हेच मध्यवर्ती ठिकाण आहे.

- **डॉ. मंगलकुमार पाटील,** प्राचार्य डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज.

“ चंदगड व आजरा हे तालुके विद्यापीठापासून खूप दूरवर आहेत. पदव्युत्तर शिक्षण आणि प्रशासकीय कामांसाठी कोल्हापूरला येणे त्यांच्यासाठी खूपच गैरसोयीचे आहे. त्यांच्यासह सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांना या उपकेंद्राचा नक्कीच फायदा होईल.

- **डॉ. अर्जुन कुंभार,** प्राचार्य, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड.

“ गडहिंग्लज उपविभाग हा नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे. त्यामुळे ऊस व दुधाबरोबरच काजू, रताळे, आंबा, फणस, यावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारण्यासाठी आवश्यक कौशल्य शिक्षण देणारे अभ्यासक्रम राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी उपकेंद्राचा मोठा उपयोग होईल.

- **डॉ. सतीश घाळी,** सिनेट सदस्य तथा कार्याध्यक्ष विद्याप्रसारक मंडळ, गडहिंग्लज.

“ गडहिंग्लजला उपकेंद्राची मागणी योग्यच आहे. शैक्षणिकदृष्ट्या विकसित झालेल्या गडहिंग्लजला दळणवळणासह सर्व सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे सीमाभागासह परिसरातील २८ महाविद्यालये आणि सुमारे ३० हजार विद्यार्थ्यांची सोय होणार आहे.

- **डॉ. पी. बी. पाटील,** प्राचार्य,हिरे कॉलेज, गारगोटी.

“ गडहिंग्लज हे सीमाभागातील महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र आहे. त्यामुळे याठिकाणी उपकेंद्र झाल्यास चंदगड आजऱ्यासह भुदरगड व कागल तालुक्यातील विद्यार्थ्यांसह महाविद्यालयांच्या प्रशासकीय कामांची सोय होईल.

- **सतीश पाटील,** जि. प. उपाध्यक्ष तथा संस्थाध्यक्ष साई एज्युकेशन सोसायटी, गडहिंग्लज.

“ विद्यापीठाच्या अधिसभेत ठराव मांडणार विद्यार्थी व पालकांची मागणी रास्त आहे. गडहिंग्लज विभाग आणि परिसरातील महाविद्यालयांपासून विद्यापीठापर्यंतचे भौगोलिक अंतर विचारात घेता उपकेंद्र गडहिंग्लजमध्येच होणे योग्य आहे. येत्या डिसेंबरमध्ये होणाऱ्या विद्यापीठ अधिसभेच्या बैठकीत उपकेंद्र मागणीचा ठराव आपण मांडणार आहोत.

- **एम. एल. चौगुले,** सिनेट सदस्य, शिवाजी विद्यापीठ.

पुढारी

शिवाजी विद्यापीठात कोरोना फॅब्रिक स्प्रेची निर्मिती

‘व्हायरस कवच’ हे महत्त्वपूर्ण संशोधन; विषाणू ९९ टक्के निष्क्रिय करण्याची क्षमता

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने देशवासीयांना एक गूड न्यूज दिली आहे. कोरोना विषाणू आणि इतर घातक जीवाणूंना निष्क्रिय करू शकणारे महत्त्वपूर्ण व दिलासादायक संशोधन या विद्यापीठाच्या नॅनो फॅब्रिक्स सेंटरच्या संशोधकांनी केले आहे. संशोधकांनी कपड्यांवर फवारण्याचा फॅब्रिक स्प्रे तयार केला असून त्याचे नाव ‘व्हायरस कवच’ असे आहे. या स्प्रेमुळे कोरोना व्हायरससह इतर कित्येक घातक विषाणूंना निष्क्रिय करणे शक्य होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाच्या प्रभावाने कोरोना विषाणू पान ४ वर ▸

विषाणूंविरोधी स्प्रे प्रभावी असल्याचा विद्यापीठ, इकोसायन्स इनोव्हेशन कंपनीचा दावा

कसा काम करतो फॅब्रिक स्प्रे

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ नॅनोफॅब्रिक्सचे प्रा. किरणकुमार शर्मा यांनी प्रा. पी.एस. पाटील व डॉ. किरण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले. ‘व्हायरस कवच’ फॅब्रिक स्प्रे हे वापरावयास सोपे आहे. हा स्प्रे कपड्यांवर फवारायचा आहे. वाळल्यानंतर पुढे तो कपडे धुऊन स्वच्छ होईपर्यंत संरक्षक कवचाप्रमाणे काम करतो. यात केवळ सेंद्रिय कार्बोक्झिलिक ॲसिडची संयुगे आहेत. ही संयुगे अजिबात विषारी नाहीत तर पर्यावरणपूरक आहेत, असा दाखला अमेरिकेतील पर्यावरण सुरक्षा एजन्सी ‘यूएसईपीए’ने दिला आहे. अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने त्यास मान्यता दिली आहे.

“ ‘व्हायरस कवच’ फॅब्रिक स्प्रेची शासकीय मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत टेस्ट झाली आहे. पुण्याच्या ‘एनआयव्ही’कडे टेस्टिंगसाठी अर्ज केला आहे. त्यांच्याकडे कामाचा व्याप असल्याने उत्पादनाला विलंब झाला असता. त्यामुळे अमेरिकेच्या बायोसेफ्टी लेव्हल-४ प्रयोगशाळेत स्प्रेच्या अँटिव्हायरल गुणधर्माची तपासणी केली.

- जयंत म्हेतर,
सीईओ, इकोसायन्स इनोव्हेशन, पुणे

पुढारी

शिवाजी विद्यापीठात कोरोना फॅब्रिक स्प्रेची निर्मिती

(पान १ वरून) ९९.९९ टक्क्यांपेक्षा अधिक निष्क्रिय झाल्याचे आंतरराष्ट्रीय चाचण्यांमध्ये आढळले आहे, असा दावा विद्यापीठ आणि इकोसायन्स इनोव्हेशन कंपनीने केला आहे.

विद्यापीठात शनिवारी सकाळी नॅनोसायन्स व तंत्रज्ञान स्कूलचे डॉ. किरणकुमार शर्मा या संशोधकांसह उत्पादनाच्या निर्मितीत भूमिका बजावणाऱ्या पुणे येथील इकोसायन्स इनोव्हेशन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत म्हेतर, संचालक अजय म्हेतर यांनी

कुलगुरू डॉ. करमळकर व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांना भेटून या संशोधनाबद्दल माहिती दिली.

'व्हायरस कवच' उत्पादनाच्या जगभरातील विविध प्रयोगशाळांमध्ये चाचण्या घेण्यात आल्या. त्यात विविध घातक विषाणूंना निष्क्रिय करण्याच्या त्याच्या गुणधर्मावर शिक्कामोर्तब झाले आहे. याचे अँटिमायक्रोबायल गुणधर्म तपासण्यासाठी व्हायरस कवच फवारलेल्या कपड्याच्या पृष्ठभागावर ग्राम-पॉझिटिव्ह प्रकारांतील (स्टिफॅलोकोकस ऑरेअस) व ग्राम-निगेटिव्ह प्रकारांतील (इर्श्चशिया कोलाय) जीवाणूंचा सुमारे १५ मिनिटे संपर्क आला असता ती ९९.९९ टक्क्यांहून अधिक निष्क्रिय झाल्याचे आढळून आले. स्प्रेच्या अँटिव्हायरल गुणधर्मांची तपासणी अमेरिकेतील बायोसेफ्टी लेव्हल-४ प्रयोगशाळेत करण्यात आली.

पहिल्या पाच संशोधनात स्थान

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान विभागात गतवर्षी 'रुसा' अंतर्गत प्राप्त निधीतून 'सेंटर फॉर नॅनो-फॅब्रिक्स' सुरू करण्यात आले. कोव्हिड -१९ या विषाणूला निष्क्रिय करणाऱ्या संयुगाची निर्मिती करून केंद्राने प्रभावी कामगिरी केली आहे. 'व्हायरस कवच' संयुगाच्या संशोधनाने केंद्र सरकारच्या निती आयोगातर्फे घेतलेल्या 'अटल इनोव्हेशन मिशन' स्पर्धेत पहिल्या पाच अभिनव संशोधनांत स्थान मिळविले होते.

सामाजिक उत्तरदायित्वाची प्रचिती देणारे संशोधन : कुलगुरू डॉ. करमळकर

कोव्हिड -१९ साथ आटोक्यात आणण्यासंदर्भातील संशोधन जगभर सुरू आहे. शिवाजी विद्यापीठ नॅनो सायन्स विभागाच्या संशोधकांनी 'व्हायरस कवच' या संयुगाची निर्मिती करून सामाजिक उत्तरदायित्वाची प्रचिती दिली आहे. सार्स-कोव्ह-२ हा विषाणू एखाद्या पृष्ठभागावर सात सात दिवस राहू शकतो. दीर्घकाळ टिकून राहण्याचा चिवटपणा असल्याने स्पर्शातून संसर्गाची शक्यता अधिक असते. यात शरीरावरील कपड्यांचा वाटा मोठा असू शकतो. 'व्हायरस कवच' तंत्रज्ञानामुळे कोरोना साखळी तोडण्याचे एक सक्षम अस्त्र आपल्या हाती आले आहे.

फॅब्रिक स्प्रेची किंमत २७० ते ४९५ रुपयांपर्यंत

'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे' हा लवकरच औषध दुकानांमधून सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध होणार आहे. याची किंमत २५० मि.लि. बाटलीसाठी २७० रुपये तर ५०० मि.लि.साठी ४९५ इतकी असणार आहे. सध्या पुण्यातील 'इकोसायन्स'च्या प्रकल्पामधून दररोज सुमारे ५००० बाटल्यांचे उत्पादन केले जात आहे.

शिवाजी विद्यापीठाने केली 'व्हायरस कवच'ची निर्मिती

कोरोनाबाबत संशोधन, फायबर स्प्रेमुळे विषाणूंना रोखणे शक्य

कोल्हापूर : प्रतिनिधी

संपूर्ण जगाला ग्रासलेल्या कोविड-१९ अर्थात कोरोना या विषाणूला निष्क्रिय करू शकणारे महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक संशोधन येथील शिवाजी विद्यापीठाच्या नॅनोफॅब्रिक्स सेंटरच्या संशोधकांनी केले आहे. 'व्हायरस कवच' या फॅब्रिक स्प्रे (कपड्यांवर मारावयाचा फवारा) तंत्रज्ञानामुळे कोरोना व्हायरससह इतर अनेक घातक विषाणूंना निष्क्रिय करणे शक्य होणार आहे. ही माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

नॅनोसायन्स व तंत्रज्ञान स्कूलचे डॉ. किरणकुमार शर्मा या संशोधकांसह या उत्पादनाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पुणे येथील इकोसायन्स इनोव्हेशन या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत म्हेतर, संचालक अजय म्हेतर यांनी कुलगुरू डॉ. करमळकर व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांना भेटून या संशोधन व उत्पादनाबद्दल माहिती दिली. या तंत्रज्ञानाच्या प्रभावाने कोविड-१९ विषाणू ९९.९९ टक्क्यांपेक्षाही अधिक निष्क्रिय झाल्याचे आंतरराष्ट्रीय चाचण्यांमध्ये आढळल्याचे त्यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ नॅनोफॅब्रिक्सचे प्रा. किरणकुमार शर्मा यांनी प्रा. पी. एस. पाटील, ▶▶ पान ७ वर

कोरोना 'व्हायरस कवच' फॅब्रिक स्प्रेची निर्मिती

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनोफॅब्रिक्स व तंत्रज्ञान विभागाचे संशोधन : लवकरच बाजारात

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोना विषाणूला निष्क्रिय करू शकणारे महत्त्वपूर्ण संशोधन शिवाजी विद्यापीठाच्या नॅनोफॅब्रिक्स सेंटरच्या संशोधकांनी केले आहे. येथे संशोधित करण्यात आलेल्या 'व्हायरस कवच' या फॅब्रिक स्प्रे (कपड्यांवर मारावयाचा फवारा) तंत्रज्ञानामुळे कोरोना व्हायरससह अन्य अनेक घातक विषाणूंना निष्क्रिय करणे शक्य होणार असल्याची माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी शनिवारी दिली.

विद्यापीठात सकाळी नॅनोसायन्स व तंत्रज्ञान स्कूलचे डॉ. किरणकुमार शर्मा यांच्यासह या उत्पादनाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पुणे येथील इकोसायन्स इनोव्हेशन प्रा. लि. चे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत म्हेतर, संचालक अजय म्हेतर यांनी डॉ. करमळकर व डॉ. विलास नांदवडेकर यांना संशोधन व उत्पादनाबद्दल माहिती दिली. 'व्हायरस कवच' तंत्रज्ञानाच्या प्रभावाने कोविड-१९ विषाणू ९९.९९ टक्क्यांपेक्षाही अधिक निष्क्रिय झाल्याचे आंतरराष्ट्रीय चाचण्यांमध्ये आढळल्याची माहिती त्यांनी दिली.

पान ४ पहा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्सतर्फे संशोधित व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे डॉ. नितीन करमळकर यांना देताना जयंत म्हेतर. सोबत डॉ. किरणकुमार शर्मा, डॉ. पी. एस. पाटील, अजय म्हेतर, डॉ. विलास नांदवडेकर.

UNI
BREVITY ACCURACY SPEED
United News of India
India's Multi Lingual News Agency
Sunday, Jul 19 2020 | Time 19:20 Hrs(IST)

Posted at: Jul 18 2020 9:01PM

Anti-viral fabric spray coating to protect against bacteria & coronavirus

Kolhapur, Jul 18 (UNI) Virus Kavach Fabric Technology demonstrated excellent results when tested against bacteria.

This was found out in a project by Ecoscience Innovation Pvt. Ltd., a pune based company, through a Consultancy Pilot Project of Product Development at School of Nanoscience and Technology, Shivaji University, Kolhapur.

The pilot project on Product Development and Validation of "Virus Kavach Fabrics Technology" for its Antimicrobial and Antiviral Proprties is being led by Prof. Kiran Kumar K. Sharma with the support from Prof. Pramod S. Patil and Dr. Kiran D. Pawar.

Please log in to get detailed story.

UNI Photo

NEW DELHI, JULY 19 (UNI):- Union Minister of Health and Family Welfare Harsh Vardhan during the launch of 'Plasma Donation Campaign' organised by the Delhi Police, at All

Other Links

UNIVARTA (News Agency)

'करोना' निष्क्रिय करणारे तंत्रज्ञान शिवाजी विद्यापीठाकडून विकसित

(पान १ वरून)

त्यामध्ये विविध घातक विषाणूंना निष्क्रिय करण्याच्या त्याच्या गुणधर्मावर शिक्कामोर्तब झाले आहे. याचे अँटिमायक्रोबायल गुणधर्म तपासण्यासाठी व्हायरस कवच फवारलेल्या कपड्याच्या पृष्ठभागावर ग्राम-पॉझिटिव्ह प्रकारांतील (स्टॅफिलोकोकस ऑरियस) आणि ग्राम-निगेटिव्ह प्रकारांतील (इशेरिषिया कोलाय) जीवाणूंचा सुमारे १५ मिनिटे संपर्क आला असता ती ९९.९९ टक्क्यांहूनही अधिक निष्क्रिय झाल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे या स्प्रेच्या अँटिव्हायरल गुणधर्मांची तपासणी अमेरिकेतील बायोसेफ्टी लेव्हल-४ प्रयोगशाळेत करण्यात आली. या ठिकाणी 'व्हायरस कवच' फवारलेल्या कपड्यांवर सार्स-कोव्ह-२ हा 'कोविड-१९' साथीला जबाबदार असलेला विषाणूसुद्धा ९९.९९ टक्क्यांहून अधिक निष्क्रिय झाल्याचे आढळून आले आहे. या संशोधनाबद्दल शिवाजी विद्यापीठाचे समाजातील विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. त्याबद्दल कुलगुरू कळमकर यांनी आभार मानले आहे.

छत्रपती शिवरायांचा इतिहास प्रेरणादायी

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे प्रतिपादन : 'प्रेरणा-२०२०' शिबिराचा ऑनलाईन समारोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज देशासह संपूर्ण जगभराचे प्रेरणास्थान आहे. शिवकालीन इतिहास आजही देशाप्रती आपले कर्तव्य निभावण्यासाठी प्रेरित करणारा आहे. युवा पिढीने शिवकालीन इतिहासाची प्रेरणा घेत देश कार्यासाठी सिद्ध व्हावे, असे प्रतिपादन राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रेरणा-२०२०' या राज्यस्तरीय नेतृत्वगुण विकास प्रशिक्षण शिबिराचा गुरुवारी ऑनलाईन समारोप झाला. याप्रसंगी राज्यपाल कोश्यारी बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर होते.

कुलपती कोश्यारी म्हणाले, शिवरायांचे जीवन व कार्य तरुणांसाठी प्रेरणाशक्ती आहे. शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करण्याचा निर्धार देशातील जनतेने करावा. या शिबिरात 'पद्मश्री' पुरस्कारप्राप्त मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कोरोनाच्या काळात शिवाजी विद्यापीठाने राज्यस्तरीय नेतृत्वगुण विकास शिबिर आयोजित करून राज्यभरातील सर्व विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व विकासाची संधी उपलब्ध करून दिली. कार्यक्रमाची सुरुवात

मराठी भाषेतून करून विद्यापीठाने मातृभाषेचे महत्व राज्यातील शिक्षण क्षेत्राला समजावून सांगितले. अध्यक्षस्थानावरून प्रभारी कुलगुरु डॉ. करमळकर म्हणाले, महापुरुषांच्या चरित्रांतून, व्यक्तिमत्वांतून तरुणांना प्रेरणा मिळते.

या प्रेरणा शिबिरात डॉ. अभय बंग, पोपटराव पवार, डॉ. प्रकाश आमटे, इंद्रजित देशमुख, डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, डॉ. भास्कर पेरे-पाटील, सयाजी शिंदे, डॉ. अविनाश पोळ आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन केले.

कुलपती नामनिर्देशित व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. अभय जायभाये यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. राज्य संपर्क अधिकारी डॉ. अतुल साळुंके यांनी शिबिराचा आढावा सादर केला. प्रा. ज्ञानराजा चिघळीकर यांनी आभार मानले.

कोल्हापूरच्या संशोधकांचे ‘व्हायरस कवच’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात कपड्यांवरील फवाऱ्याची निर्मिती

संपूर्ण जगाला ग्रासलेल्या करोना विषाणूला निष्क्रिय करू शकणारे महत्त्वपूर्ण संशोधन येथील शिवाजी विद्यापीठाच्या नॅनोफॅब्रिक्स सेंटरने केले आहे. येथे संशोधित केलेल्या ‘व्हायरस कवच’ या कपड्यांवर मारावयाचा फवारा या तंत्रज्ञानामुळे करोनासह अन्य घातक विषाणू निष्क्रिय करणे शक्य होणार आहे.

‘व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे तंत्रज्ञान’ हे वापरावयास अत्यंत सुलभ आहे. हा स्प्रे आपल्या कपड्यांवर फवारला की, तो वाळल्यानंतर कपडे धुवेपर्यंत आपल्याभोवती संरक्षक कवचाप्रमाणे काम करतो. यामध्ये केवळ सेंद्रिय कार्बोक्झिलिक ॲसिडची संयुगे आहेत, जी बिनविषारी, पर्यावरणपूरक आहेत, असा दाखला अमेरिकेतील पर्यावरण सुरक्षा एजन्सीने दिला असून त्याला अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने मान्यताही दिलेली आहे.

‘व्हायरस कवच’ संयुगाच्या संशोधनाने नीती आयोगातर्फे घेण्यात आलेल्या अटल इनोव्हेशन मिशन या स्पर्धेत पहिल्या पाच अभिनव संशोधनांत स्थान मिळविले होते. प्रा. किरणकुमार शर्मा यांनी प्रा. पी.एस. पाटील आणि डॉ. किरण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले आहे. विद्यापीठात नॅनोसायन्स व तंत्रज्ञान स्कूलचे डॉ. किरणकुमार शर्मा या संशोधकांसह या उत्पादनाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पुणे येथील इकोसायन्स इनोव्हेशन प्रा.लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत म्हेतर, संचालक अजय म्हेतर यांनी कुलगुरू डॉ. करमळकर व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांना भेटून या संशोधनाबद्दल माहिती दिली. ‘व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे’ हा लवकरच सर्व महत्त्वाच्या औषध दुकानांमधून उपलब्ध होणार आहे. ‘इकोसायन्स’ची सुमारे पाच हजार बाटल्या प्रतिदिन उत्पादन क्षमता आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर चाचण्या

‘व्हायरस कवच’च्या जगातील आघाडीच्या प्रयोगशाळांत घेतलेल्या चाचण्यांमध्ये विविध घातक विषाणूंना निष्क्रिय करण्याच्या त्याच्या गुणधर्मांवर शिक्कामोर्तब झाले. याचे ॲंटिमायक्रोबायल गुणधर्म तपासण्यासाठी व्हायरस कवच फवारलेल्या कपड्याच्या पृष्ठभागावर ग्राम-पॉझिटिव्ह प्रकारांतील (स्टॅफिलोकोकस ऑरियस) आणि ग्राम-निगेटिव्ह प्रकारांतील (इशेरिचिया कोलाय) विषाणूंचा सुमारे १५ मिनिटे संपर्क आला असता, ती ९९.९९ टक्क्यांहूनही अधिक निष्क्रिय झाल्याचे आढळून आले. या स्प्रेच्या ॲंटिव्हायरल गुणधर्मांची तपासणी अमेरिकेतील बायोसेफ्टी लेव्हल-४ प्रयोगशाळेत केली असता, सार्स-कोव्ह-२ हा ‘कोविड-१९’ साथीला जबाबदार असलेला विषाणू सुद्धा ९९.९९ टक्क्यांहून अधिक निष्क्रिय झाल्याचे आढळून आले.

पुण्य नगरी

शिवाजी विद्यापीठाने केली 'व्हायरस कवच'ची निर्मिती

(पान १ वरून) डॉ. किरण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या संदर्भातील संशोधन केले आहे.

काय आहे संशोधन?

'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे तंत्रज्ञान' हे वापरावयास अत्यंत सुलभ आहे. हा स्प्रे कपड्यांवर फवारायचा आहे. वाळल्यानंतर पुढे तो कपडे धुवून टाकेपर्यंत संरक्षक कवचाप्रमाणे काम करतो. यामध्ये केवळ सेंद्रिय कार्बोक्झिलिक ॲसिडची संयुगे असून पर्यावरणपूरक आहेत, असा दाखला अमेरिकेतील पर्यावरण सुरक्षा एजन्सीने दिला आहे. त्याला अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने मान्यताही दिलेली आहे.

काय आढळले चाचण्यांत?

'व्हायरस कवच' या उत्पादनाच्या देशासह जगातील आघाडीच्या प्रयोगशाळांत चाचण्या घेण्यात आल्या आहेत. त्यामध्ये विविध घातक विषाणूंना निष्क्रिय करण्याच्या त्याच्या गुणधर्मावर शिक्कामोर्तब झाले आहे.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्सतर्फे संशोधित 'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे' कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना सादर करताना इकोसायन्स इनोव्हेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत म्हेतर. सोबत डॉ. किरणकुमार शर्मा, डॉ. पी. एस. पाटील, अजय म्हेतर व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

सामाजिक उत्तरदायित्वाची प्रचिती

कोविड-१९ साथीला आटोक्यात आणण्याबरोबरच या कोरोना विषाणूला अटकाव करण्यासाठीचे संशोधन जगभरात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स विभागाच्या संशोधकांनी 'व्हायरस कवच' या संयुगाची निर्मिती करून सामाजिक उत्तरदायित्वाची प्रचिती दिली आहे. त्यांची कामगिरी अभिमानास्पद आहे.

-डॉ. नितीन करमळकर, प्रभारी कुलगुरू

कोरोनापासून बचावासाठी ‘फॅब्रिक स्प्रे’

विद्यापीठाच्या नॅनो स्कूल ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी विभागाचे संशोधन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो स्कूल ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी अधिविभागातील संशोधकांनी फॅब्रिक स्प्रे बनवला आहे. हा स्प्रे कपड्यांवर मारायचा असून, तो व्हायरस कवच म्हणून काम करतो. स्प्रेमुळे घातक विषाणूंपासून संरक्षण होते, अशी माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी आज येथे दिली.

पान ६ वर »

कोरोनाच्या संकटातून जगाला मुक्त करण्यासाठी सर्वत्र प्रयत्न सुरू आहेत. कोरोना विषाणूंना रोखणाऱ्या व्हायरस कवचची निर्मिती करून शिवाजी विद्यापीठातील नॅनो स्कूल ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी विभागातील संशोधकांनी सामाजिक उत्तरदायित्व निभावले आहे.
- डॉ. नितीन करमळकर,
प्रभारी कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ

वापरण्यास सुलभ

व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे तंत्रज्ञान वापरावयास अत्यंत सुलभ आहे. स्प्रे फक्त कपड्यांवर फवारायचा आहे. वाळल्यावर पुढे तो कपडे धुवेपर्यंत संरक्षक कवचाप्रमाणे काम करतो.

गुणधर्मावर शिक्कामोर्तब

यात केवळ सेंद्रिय कार्बोक्झिलिक ॲसिडची संयुगे आहेत. ती विषारी नसून, पर्यावरणपूरक आहेत, असा दाखला अमेरिकेतील पर्यावरण सुरक्षा एजन्सीने दिला. अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाची या संशोधनाला मान्यताही मिळाली आहे. या उत्पादनाच्या देशासह जगातील आघाडीच्या प्रयोगशाळांत चाचण्या घेण्यात आल्या. यामुळे विविध घातक विषाणूंना निष्क्रिय करण्याच्या त्याच्या गुणधर्मावर शिक्कामोर्तब झाले आहे.

कोल्हापूर : व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन कळमरकर यांना दाखविताना जयंत म्हेतर, शेजारी (डावीकडून) डॉ. किरणकुमार शर्मा, डॉ. पी. एस. पाटील, अजय म्हेतर, डॉ. विलास नांदिवडेकर.

कोरोनापासून बचावासाठी 'फॅब्रिक स्प्रे'

» पान १ वरून

विद्यापीठात आज सकाळी नॅनो सायन्स व तंत्रज्ञान स्कूलचे डॉ. किरणकुमार शर्मा, इको सायन्स इनोव्हेशन प्रा. लि. या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत म्हेतर, संचालक अजय म्हेतर यांनी कुलगुरू डॉ. करमळकर व कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांना भेटून या अत्यंत महत्त्वपूर्ण संशोधन व उत्पादनाबद्दल माहिती दिली. शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ नॅनो फॅब्रिक्सचे प्रा. किरणकुमार शर्मा, प्रा. पी. एस. पाटील आणि डॉ. किरण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या संदर्भातील संशोधन झाले आहे.

अमेरिकेच्या लॅबचे प्रमाणपत्र

याचे ॲंटिमायक्रोबायल गुणधर्म तपासण्यासाठी व्हायरस फवारलेल्या कपड्याच्या पृष्ठभागावर ग्राम-पॉझिटिव्ह प्रकारांतील (स्टॅफिलोकोकस ऑरियस) आणि ग्राम-निगेटिव्ह प्रकारांतील (इशेरिषिया कोलाय) जीवाणूंचा सुमारे १५ मिनिटे संपर्क आला, त्यावेळी ती ९९.९९ टक्क्यांहूनही अधिक निष्क्रिय झाल्याचे आढळून आले. या ठिकाणी व्हायरस कपड्यांवर सार्स फॅमिलीतील कोविड विषाणूही ९९.९९ टक्क्यांहून अधिक निष्क्रिय झाल्याचे आढळून आले. अमेरिकेतील बी.एस.एल. ही प्रयोगशाळा फॅब्रिक ॲनालिसिसमध्ये जगातल्या आघाडीच्या सहा लॅबपैकी एक असून, तेथील निष्कर्ष जगभरात मान्य केले जातात.

कोरोना 'व्हायरस कवच' फॅब्रिक स्प्रेची निर्मिती

पान १ वरुन

शिवाजी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ नॅनोफॅब्रिक्सचे प्रा. किरणकुमार शर्मा यांनी प्रा. पी. एस. पाटील आणि डॉ. किरण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या संदर्भातील संशोधन केले आहे. 'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे' हा लवकरच सर्व महत्त्वाच्या औषध दुकानांमधून सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध होणार आहे. याची किंमत २५० मिलि बाटलीसाठी रु. २७० तर ५०० मिलिसाठी रु. ४९५ इतकी असणार आहे.

काय आहे संशोधन?

'व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रे' फक्त आपल्या कपड्यांवर फवारायचा आहे. वाळल्यानंतर पुढे तो कपडे धुवून टाकेपर्यंत आपल्याभोवती संरक्षक कवचाप्रमाणे काम करतो. कपडे धुतल्यानंतर पुन्हा त्यावर स्प्रे फवारावा लागतो. यात केवळ सेंद्रिय कार्बोक्झिलिक ॲसिडची संयुगे आहेत.

काय आढळले चाचण्यांत

देशासह जगातील आघाडीच्या प्रयोगशाळांत या व्हायरस कवच फॅब्रिक स्प्रेची चाचणी घेण्यात आली. याचे ॲंटिमायक्रोबायल गुणधर्म तपासण्यासाठी व्हायरस कवच फवारलेल्या कपड्याच्या पृष्ठभागावर ग्राम-पॉझिटिव्ह प्रकारातील (स्टॅफिलोकोकस ऑरियस) आणि ग्राम-निगेटिव्ह प्रकारातील (इशेरिचिया कोलाय) जीवाणूंचा सुमारे १५ मिनिटे संपर्क आला असता ती ९९.९९ टक्क्यांहूनही अधिक निष्क्रिय झाल्याचे दिसले. त्याचप्रमाणे या स्प्रेच्या ॲंटिव्हायरल गुणधर्मांची तपासणी अमेरिकेतील बायोसेफ्टी लेव्हल-४ प्रयोगशाळेत झाली. या ठिकाणी 'व्हायरस कवच' फवारलेल्या कपड्यांवर सार्स-कोव्ह-२ हा कोविड-१९ साथीला जबाबदार असलेला विषाणू सुद्धा ९९.९९ टक्क्यांहून अधिक निष्क्रिय झाल्याचे आढळून आले.

विद्यापीठाच्या सामाजिक उत्तरदायित्वाची प्रचिती देणारे संशोधन : डॉ. करमळकर

कोरोनावरील लसीचे संशोधन जगभरात सुरू आहे. शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स विभागाच्या संशोधकांनी व्हायरस कवच या संयुगाची निर्मिती करून आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाची प्रचिती दिली आहे. त्यांची कामगिरी अभिमानास्पद आहे, असे गौरवोद्‌गार प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी काढले.

विद्यापीठाच्या नॅनोसायन्स व तंत्रज्ञान विभागाचे मोलाचे संशोधन

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान विभागाने या संशोधनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. केंद्राने पहिल्याच टप्प्यात साऱ्या जगाची डोकेदुखी असणाऱ्या कोविड-१९ या विषाणूला निष्क्रिय करणाऱ्या संयुगाची निर्मिती करून प्रभावी कामगिरी करून दाखविली आहे. व्हायरस कवच संयुगाच्या संशोधनाने भारत सरकारच्या निती आयोगातर्फे घेण्यात आलेल्या अटल इनोव्हेशन मिशन या स्पर्धेत पहिल्या पाच अभिनव संशोधनात स्थान मिळविले होते.